# कृषि विभाग महाराष्ट्र शासन
# ई- निविदा सूचना
## शेतकरी मासिक छपाई
## आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे -४११००१

महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाकडून मराठी भाषेत प्रकाशित होणा-या मराठी शेतकरी मासिकातील लेखांचे संपादन-सुलभीकरण करणे, लेखांची मांडणी-सजावट करणे व अंतिम डमी आर्टवर्क मान्य झाल्यानंतर आवश्यक प्रकारात छपाईदारास देवून मासिकाची चाररंगी वेब छपाई करणे व त्यावर वर्गणीदारांचे पत्ते स्टीकरवर प्रिंट घेऊन चिकटविणे व पुणेस्थित पोस्ट कार्यालयात पोहोच करणे, इत्यादी अनुषंगिक कामासाठी आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे-४११००१ हे ज्यांचे स्वतःचे मुद्रणालय असलेल्या सक्षम प्रकाशन संस्था/मुद्रणालय यांच्या ठेकेदारांकडून निविदा मागवित आहेत.

**कामाचे नाव** - एक वर्षासाठी मराठी शेतकरी मासिकातील लेखांचे संपादन-सुलभीकरण करणे, लेखांची मांडणी-सजावट करणे व अंतिम डमी आर्टवर्क मान्य झाल्यानंतर आवश्यक प्रकारात छपाईदारास देवून मासिकाची चाररंगी मासिकाची वेब छपाई करणे व त्यावर वर्गणीदारांचे पत्ते स्टीकरवर प्रिंट घेऊन चिकटविणे व पुणेस्थित पोस्ट कार्यालयात पोहोच करणे, इत्यादी अनुषंगिक कामे.

सदर निविदा प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राहील. वरील कामाची निविदा व निविदेच्या अटी शर्ती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा सूचना क्रमांक | शेमासे /निविदा-सूचना/प्रसिध्दी/२०१६-१७/ विप्र-६/३५२/२०१६ |
| २ | निविदा प्रसिध्दी दिनांक | दि. ०४/०७/२०१६ |
| ३ | निविदा डाऊनलोड सुरूवात दिनांक | दि. ०४/०७/२०१६ सकाळी ११.०० वाजता |
| ४ | निविदा पुर्वचर्चा सभा | दि. ०८/०७/२०१६ दुपारी २.३० वाजता |
| ५ | निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक | दि. १८/०७/२०१६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत |
| ६ | निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | दि. १९/०७/२०१६ सकाळी १२.०० वाजता |
| ७ | निविदा उघडण्याचे ठिकाण | कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर संकूल, दुसरा मजला, शिवाजीनगर, पुणे- ४११००५ |

काही कारणास्तव निविदा मंजूर करणे किंवा नाकारणे तसेच काही अपरिहार्य कारणास्तव निविदा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त कृषि यांना राहतील. निविदा फॉर्मची किंमत रू. १५,०००/- प्रती निविदा फॉर्म (नापरतावा) व इसारा रक्कम रू. १,५०,०००/-(रू. एक लाख पन्नास हजार फक्त) प्रती निविदा (परतावा योग्य) ऑनलाइन पध्दतीने जमा करणे अनिवार्य आहे.

स्वाक्षरीत/-

**कृषि संचालक (विप्र)**

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य

पुणे